नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६
सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर
निशाणी क्र. ७४

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– विक्रमसिंह श्रीकांत देवकुळे
**वय** :– २९ वर्षे, **धंदा** :– चालक
**राहणार** :– गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री बी. डी. काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** माझ्या घरी माझी आई, पत्नी व आजी असे एकत राहतो. घटना दिनांक १६/०९/२०१६ रोजी संध्याकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान घडली होती. मी व माझा मित्र आशिष संपत सोहनी असे गोमेवाडी येथील गणपती मंदीराजवळ गेलो होतो. तेथे आम्ही थांबलो असताना त्याठिकाणी प्रदीप भिमराव सरगर हे होते. प्रदीप सरगर आम्हाला म्हणाले तुम्ही येथे का थांबला आहात, शिवीगाळ करु लागले. आम्ही त्याला म्हणालो, ''शिवीगाळ करु नका, आम्ही येथून जातो'', त्यावर प्रदीप भिमराव सरगर याने माझ्या कानपाडात मारली आणि मला लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली. माझा मित्र आशिष सोहनी याने सोडवासोडव केली.

**०२.** आम्ही घरी जात असताना दादासाहेब वसंत पाटील, सचिन वसंत पाटील, प्रविण बबन घाडगे, प्रदीप भिमराव सरगर या चौघांनी आम्हाला खाली पाडून लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली. प्रदीप भिमराव सरगर म्हणाला की,''तुम्हाला मगाशी मस्ती आली होती का''. दादासाहेब वसंत पाटील याने त्याच्या कमरेला असलेला चाकू काढून माझा मित्र आशिष याच्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारला. त्यामुळे आशिषला रक्ताची जखम झाली आणि त्याठिकाणी लोक जमले. नाना तुकाराम आवळे, समाधान ऐवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे यांनी सोडवासोडव केली. त्यानंतर माझा मित्र आशिष याने आटपाडी पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

**०३.** मला ज्या लोकांनी मारहाण केली, त्यांना पाहिल्यास ओळखू शकतो, ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

## उलटतपास आरोपींतर्फे – श्री. डी.व्ही.शिंदे विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु

**०४.** मी लहानपणापासून गोमेवाडी येथे राहतो. आशिष देखील लहाणपणापासून गोमेवाडी येथे राहत असून तो माझा चांगला मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, नाना तुकाराम आवळे, समाधान ऐवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की नाना तुकाराम आवळे, समाधान ऐवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे हे सर्व

आशिष सोहनी याच्या समाजाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी, आशिष आणि नाना तुकाराम आवळे, समाधान ऐवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे हे सर्व मागासवर्गीय समाजाचे आहोत. त्यावेळी मी काय मिळेल ते काम करत होतो. घटनेच्या काळामध्ये अगर त्यादरम्यान मी आणि आशिष मोबाईल वापरत नव्हतो. असे घडले होते की, ज्यावेळी पोलिसांनी चौकशी केली, त्यावेळी पोलिसांना मी ७०२८१०७८९७ असा मोबाईल क्रमांक सांगितलेला होता.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे माझ्या गावातील असून त्यांना मी पूर्वीपासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की आरोपी हे धनगर आणि मराठा समाजाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी आणि आरोपी एका जागी किंवा एका परिसरात राहत नाही. हे मला माहित नाही की सरगर काय कामधंदा करतात. असे घडले होते की, घटनेपूर्वी माझी सरगर याच्याबरोबर तक्रार झाली होती. असे घडले होते की, त्याबाबत मी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दिली होती. ज्यावेळी पोलीस चौकशीकरिता माझ्याकडे आले होते त्यावेळी मी पोलिसांना माझे आणि सरगर यांच्यामध्ये पूर्वी झालेल्या तक्रारीची माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की दादासाहेब पाटील आणि सचिन पाटील हे दोघे सख्खे भाऊ आहेत. हे मला माहित नाही की दादासाहेब पाटील हे त्यावेळी विकास सोसायटीचे चेअरमन होते आणि गावातील राजकारणात सक्रीय होते किंवा कसे. असे घडले नाही की, सरगर व्यतिरिक्त इतर आरोपींसोबत माझी पूर्वी तक्रारी झाल्या होत्या किंवा नव्हत्या याबाबत पोलिसांना चौकशीदरम्यान सांगितले नव्हते.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटना घडली त्यावेळी गावामध्ये गणपतीची यात्रा सुरू होती. हे म्हणणे खरे आहे की, या यात्रेला गोमेवाडी आणि आजुबाजूच्या परिसरातील सर्व समाजाचे लोक जमा होतात. हे म्हणणे खरे आहे की, गणपतीचे मंदीर हे गोमेवाडी गावच्या मध्यभागी असून मंदीराच्या आजूबाजूला राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की संध्याकाळच्या वेळी गणपती मंदीरात दर्शनाला येणा–या–जाणा–यांची गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, यात्रेनिमित्त गणपती मंदीराच्या आसपास वेगवेगळे स्टॉल्स लावलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, दर्शन आणि यात्रा रात्री उशिरा पर्यंत सुरू असते.

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, मी किंवा आशिष सोहनी गणपती मंदीराच्या परिसरात राहात नाहीत. गणपती मंदीरापासून मी २०० ते ३०० मीटर अंतरावर राहतो. असे घडले नव्हते की, तथाकथित घटना घडण्यापूर्वी माझी आणि प्रदीप सरगर यांच्याशी भेट झालेली नव्हती. त्यादिवशी मी आणि आशिष सोहनी २.०० ते ३.०० वाजल्यापासून एकत्र होतो. असे घडले होते की, मी आणि आशिष दोघे एकत्र गणपती मंदीराजवळ गेलो होतो. आम्ही दोघे एकत्र संध्याकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान गणपती मंदीराजवळ गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की आम्ही ज्यावेळी गणपती मंदीराजवळ गेलो त्यावेळी गावातील बरेच लोक मंदीरात दर्शनासाठी येत–जात होती. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीरात जाण्यासाठी प्रथम पाय–या आहेत. हे म्हणणे खरे आहे की पाय–यांच्या दोन्ही बाजूला हार, नारळ विक्रीचे स्टॉल आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पाय–यांच्या वर दर्शनाला येणारे–जाणारे कायम लोक असतात. असे घडले नव्हते की,

संध्याकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान मी आणि आशिष गणपती मंदीराच्या पाय–यांवर उभे होतो. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीराच्या पाय–यासोडून पाय–याच्या समोरील भागात दर्शनाला येणा–या आणि जाणा–या लोकांची गर्दी होती. असे घडले नाही की, तपासादरम्यान पोलीस माझ्याकडे आले आणि घटना कोठे घडली आहे ते दाखवा असे म्हणाले. असे घडले नाही की, पूर्ण चौकशीदरम्यान मी पोलिसांकडे गेलो आणि घटना कोठे घडली हे दाखवले.

०८. असे घडले होते की, ज्यावेळी पहिली घटना घडली त्यावेळी गावातील पाहणा–या लोकांची गर्दी जमली होती. असे घडले नाही की, तथाकथित पहिल्या घटनेनंतर मी पोलिसांना फोन केला अगर त्यांची मदत मागितली. मला पोलिसांनी चौकशीदरम्यान असे विचारले नाही की, पहिल्या घटनेनंतर दुसरी घटना किती वेळाने घडली. असे घडले नाही की, त्यावेळेबाबत मी पोलिसांना स्वतःहून सांगितले होते. असे घडले होते की, मला खाली पाडून मारहाण करताना मला जखमा झाल्या नव्हत्या, माझे कपडे फाटले होते. असे घडले नाही की, चौकशीदरम्यान माझ्याकडे पोलिसांनी कपडयाबाबत चौकशी केली होती किंवा मी स्वतःहून पोलिसांना कपडे फाटल्याबाबत सांगितले होते. असे घडले नाही की, मला मारहाण झाली त्याबाबत पोलिसांनी यादी दिली होती आणि त्यानुसार मी ग्रामणी रुग्णालयात जावून उपचार घेतले होते. दिनांक १६/०९/२०१६ रोजी मी पोलीस ठाणे येथे गेलो होतो. माझी आणि आशिष बाबत झालेली तथाकथित घटना गंभीर होती याची मला कल्पना होती. असे घडले नाही की, त्यादिवशी मी स्वतःहून पोलीस ठाण्यात गेलो आणि घटनेबाबत माहिती पोलिसांना दिली. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या दिवशी पोलिसांनी बोलवेपर्यंत मी पोलीस ठाण्यात गेलो नव्हतो. ज्यादिवशी मी आशिषबरोबर पोलीस ठाण्यात गेलेलो होतो, त्यादिवशी मी आशिष बरोबर पोलीस ठाण्यातून परत आलेलो होतो. असे घडले नाही की, मी त्यादिवशी आशिष बरोबर दवाखान्यात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की मी आणि आशिष घरी परत येत असताना आशिषने पोलिसांना काय फिर्याद दिली याबाबत माझी आणि आशिषमध्ये चर्चा झाली होती. हे मला माहिती होते की, आशिषने या चार आरोपींविरुध्द तक्रार दिलेली आहे.

०९. घटनेच्या दिवशी मी आणि आशिष घरी आल्यानंतर दुस–या दिवशी पोलीस गावात येईपर्यंत मी गावातच होतो. पोलिसांनी मला आदल्यादिवशी सांगितले होते की, उद्या पोलिस ठाण्यात यायचे आहे. मी दुस–या दिवशी पोलीस ठाण्यात जाताना माझ्यासोबत आशिष नव्हता. हे मला आठवत नाही की, आदल्या दिवशी माझ्या आणि आशिष सोबत पोलिस ठाण्यामध्ये गावातील कोण लोक आले होते. रमाकांत सोहनी, नानासाहेब आवळे, सतिश देवकुळे आणि समाधान ऐवळे यांना मी ओळखतो. हे मला आठवत नाही की, रमाकांत सोहनी, नानासाहेब आवळे, सतिश देवकुळे आणि समाधान ऐवळे हे लोक माझ्यासोबत दुस–या दिवशी पोलीस ठाण्यात आले होते किंवा कसे. गणपती मंदीरापासून माझ्या राहत्या घरी पायी जाण्यास ५ ते १० मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, मी जिथे राहतो त्याच्या आजुबाजूला आमच्या समाजाचे लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरापासून गणपती मंदीरापर्यंतच्या रोडवर दोन्ही

बाजूला लोकांची राहती घरे आहेत. हे मला आठवत नाही की, रमाकांत सोहनी, नानासाहेब आवळे, सतिश देवकुळे आणि समाधान ऐवळे यांच्यापैकी काही लोक दिनांक १६/०९/२०१६ रोजी माझ्या आणि आशिषसोबत पोलिस ठाण्यात आली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की त्यादिवशी माझ्या घरातले आणि माझ्या आजुबाजूला राहणारे बरेच लोक पोलीस ठाण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये माझ्या भावकीतील लोक होते.

**१०.** हे मला माहित नाही की, घटनेपूर्वी गावातील लोकांनी मागासवर्गीय समाजाची मुले बाजारपेठेतून गाडया पळवतात, मुलींना छेडतात, हॉर्न वाजवतात अशा आशयाच्या तक्रारी तहसिलदार, पोलीस यांना दिल्या होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, गावातील लोक त्यांना अटकाव करण्यास गेले असता, ते ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देतात अशा आशयाच्या तक्रारीदेखील ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात आणि तहसिलदार यांना दिल्या होत्या. हे मला माहीत नाही की, दिनांक १७/०९/२०१६ रोजी शेकडो ग्रामस्थांनी लेखी निवेदन आटपाडी पोलीस ठाण्यात आणि तहसिलदार यांना जावून दिले होते किंवा कसे.

**११.** असे घडले होते की, आशिषला झालेल्या जखमा मी माझ्या डोळयांनी पाहिल्या होत्या. हे मला सांगता येणार नाही की, आशिष याला झालेल्या जखमा कापीव स्वरुपाच्या झाल्या होत्या किंवा कसे. असे घडले होते की, आशिषच्या हातातून येणारे रक्त त्याच्या कपड्याला लागलेले होते आणि जमिनीवर देखील पडलेले होते. असे घडले नाही की, आशिषच्या जखमेवर मी माझा रूमाल काढून बांधला किंवा त्याचे रक्त माझ्या कपड्यांना लागले होते. असे घडले नाही की तपासादरम्यान मी पोलिसांना रक्त पडलेली जागा दाखविली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ विशाल देवकुळे याच्याविरुध्द आटपाडी न्यायालयात विनयभंगाची केस दाखल होती.

**१२.** **हे म्हणणे खरे नाही की,** दिनांक १६/०९/२०१६ रोजी संध्याकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान मी व माझा मित्र आशिष संपत सोहनी असे गोमेवाडी येथील गणपती मंदीराजवळ गेलो होतो, तेथे आम्ही थांबलो असताना त्याठिकाणी प्रदीप भिमराव सरगर हे होते, प्रदीप सरगर आम्हाला म्हणाले तुम्ही येथे का थांबला आहात व शिवीगाळ करु लागले, आम्ही त्याला म्हणालो, ''शिवीगाळ करु नका, आम्ही येथून जातो'' व त्यावर प्रदीप भिमराव सरगर याने माझ्या कानपाडात मारली आणि मला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. **हे म्हणणे खरे नाही की,** आम्ही घरी जात असताना दादासाहेब वसंत पाटील, सचिन वसंत पाटील, प्रविण बबन घाडगे, प्रदीप भिमराव सरगर या चौघांनी आम्हाला खाली पाडून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, प्रदीप भिमराव सरगर म्हणाला की,''तुम्हाला मगाशी मस्ती आली होती का'', दादासाहेब वसंत पाटील याने त्याच्या कमरेला असलेला चाकू काढून माझा मित्र आशिष याच्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारला, त्यामुळे आशिषला रक्ताची जखम झाली आणि त्याठिकाणी लोक जमले, नाना तुकाराम आवळे, समाधान ऐवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे यांनी सोडवासोडव केली.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे मला आणि आशिषला कधीही लाथाबुक्क्यांनी मारहाण झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की आशिषला झालेल्या

**नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६**
**सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर**
**निशाणी क्र. ७४**

जखमा मारहाणीत झाल्या नाहीत आणि त्या चाकूच्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि आशिष यांनी गावातील मागासवर्गीय समाजाच्या लोकांच्या मदतीने व आरोपींविरुध्द राजकीय द्वेषापोटी खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ही घटना खरी आहे हे दाखविण्याकरिता मी आणि आशिष यांनी आमच्या समाजातील लोकांना साक्षीदार म्हणून सामील केले आहे. हे म्हणणे खरे नाही की आशिषच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.11.19 13:22:48 +0530

दि. १९/११/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी